नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २७/०२/२०२६ (शुक्रवार )**

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत नव्याने सुरू होणारे पोलीस ठाणे वडोदा चे उद्घाटन सोमवार, दिनांक ०२/०३/२०२६ रोजी संपन्न होणार आहे.

**नागपुर ग्रामीण जिल्हयाअंतर्गत वडोदा पोलीस ठाणे, ता. कामठी, जि. नागपूर (ग्रामीण) हे नव्याने सुरू होणार असुन दिनांक ०२/०३/२०२६ रोजी ११:०० वाजता त्या संबधीत उद्घाटन कार्यक्रम आयोजित आहे. पोलीस स्टेशन वडोदा चे उद्घाटन मा. ना. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, नागपूर जिल्हा यांच्या हस्ते होणार आहे.**

या कार्यक्रमास मा. ना. ॲड. आशीष जयस्वाल (राज्यमंत्री), मा. श्री. श्यामकुमार बर्वे (लोकसभा सदस्य, रामटेक), मा. श्री. अभिजीत वंजारी, मा. श्री. कृपाल तुमाने, मा. श्री. सुधाकर अडबाले, मा. श्री. संदीप जोशी आणि मा. डॉ. परिणय फुके (विधान परिषद सदस्य) यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तसेच मा. श्री. संदीप पाटील (विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र), मा. डॉ. विपिन इटनकर, जिल्हाधिकारी, नागपूर, मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आणि मा. श्री. अनिल म्हस्के ,अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण यांची सन्माननीय उपस्थिती राहणार आहे.

**पोलीस स्टेशन वडोदा चे कार्यक्षेत्र** :— वडोदा, गुमथळा, भुगाव, शिवनी, वरंभा, आसलवाडा, केसोरी, निंबा, चिखली, उमरी, जाखेगांव, मंगली नान्हा, रानमंगली, झरप, नेरला, झुल्लर, अंबाडी, सेलू, एकर्डी, नान्हा, महालगांव, दिघोरी, कढोली, आसोली, केम, परसाड, आडका, टेमसना, सोनेगांव राजा, गारला, भोवरी, परसोड़ी, खेडी, सावळी असे आहे.

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद
# ६ लाख ६३ हजार ७८० रूपयांचा मुद्देमाल जप्त
# १ आरोपी अटक, केळवद पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन केळवदः—** दिनांक २५/०२/२०२६ रोजी रात्री केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा बिहाडा फाटा पाढुंर्णा ते सावनेर हायवे रोड वर नाकाबंदी केली मारूती सुझुकी वॅगन आर हे चारचाकी वाहन क्रं **एम एच ४३ बी ए २८६३** हे वाहन मिळुन आले. सदर वाहन थांबवुन पंचासमक्ष वाहनाची तपासणी केली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. वाहन चालक **आरोपी नामे मोहम्मद जमिल जाकीर, वय ३० वर्ष, रा. मु पो मंगळुर पीर, जि. वाशिम हा मिळुन आला** .पोलीसांनी पंचासमक्ष १४१.७९ प्रतिबंघीत सुगंधीत तंबाखु साठा, किलो साठा किंमती २,६३,७८० /—रूपये आणि चारचाकी **वाहन क्रं एम एच ४३ बी ए २८६३** किंमती ४,००,०००/—रूपये असा एकुण ६,६३,७८० /— रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक असुन तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा व वाहतुक केली आहे. नमुद आरोपीविरूद्ध पोस्टे केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.**आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## खुनाचा प्रयत्न करणाऱ्या २ आरोपीतांना अटक

**पोलीस स्टेशन नरखेड**:– पोस्टे नरखेड अंतर्गत फिर्यादी निरज ताराचंद परीहार, वय २१ वर्ष, रा. उमरीकला, ता.जि.पांढूर्णा,राज्य मध्य प्रदेश यांनी तक्रार दिली की मौजा तेलपंच कमेटी पेठ विभाग, नरखेड येथे दिनांक २५/०२/२६ चे २२/०० ते २२/१५ वाजे दरम्यान **आरोपी क्रं १) दिपक रमेश चव्हान (डुगरावत), वय २६ वर्ष आणि त्याचा मित्र आरोपी क्रं २) योगेश संजय पंचभोले, वय २४ वर्ष, दोन्ही रा. बेलोना ता. नरखेड** यांनी संगनमत करून फिर्यादीचे जिजाजी **(जखमी**) यांनी आरोपी क्रं १ याला फिर्यादीचे बहीणीसोबत लग्न संबध जोडण्यास नकार दिल्याचे कारणावरून फिर्यादीचे जिजाजी १) कपीलसिंग भारतसिंग बघेल, रा इटारसी जि. नर्मदापूरम **(जखमी**) २) विश्वजितसिंग श्रीबालाराम राजपूत, रा.देहगाव, ता ग्यारदगंज, जि. रायसेन **(जखमी)** हे नरखेड येथे लग्नात आले असता दोन्ही आरोपी यांनी लोखंडी रॉडने मारून गंभिररित्या जख्मी करून जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केला अशा तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे

नरखेड येथे नमुद आरोपीतांविरूद्ध कलम १०९(१), ३(५) भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद केला असुन **दोन्ही आरोपीस पोलीसांनी तात्काळ ताब्यात घेवुन अटक केली आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध २० गुन्हे नोंद

नागपुर ग्रामीण जिल्हयात दिनांक २६/०२/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू,मोहाफुल सडवा आणि विदेशी दारू असा एकुण **२३,७००/—** रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

**पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी क्र. १) संजय वामणराव लांबट, वय ४५ वर्षे, रा शेडेश्वर कॉलनी, ता. उमरेड, जि. नागपूर, , २ ) साहील बंडु नान्हे, वय २७ वर्षे, रा सोनेंगांव, ता.जि नागपूर, ३) आशीष कवडुजी राउत, वय ४० वर्षे, रा चिखलापार, ता. भिवापुर जि नागपूर यांचे वर प्रत्येकी ०१ असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे आरोपी आरोपी क्रं १) सागर मदनलाल जावरकर, वय २७ वर्ष, रा.जुनी ग्रामपंचायत, टाकळघाट, ता हिगणा जिल्हा नागपुर, २) ज्ञानेश सिध्दार्थ पिलवान, वय ३४ वर्ष, रा.भारकस, ता. हिगणा जि. नागपुर यांचे वर प्रत्येकी ०१ असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन कन्हान** येथे आरोपी उमेश बशीर पात्रे, वय ३२ वर्ष, रा.सत्रापुर ,कन्हान याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन खापा** येथे आरोपी १) प्रथमेश दिनेश सहारे, वय २४ वर्ष, रा.नागलवाडी २) मंगेश हिंगे, वय ३० वर्ष, रा.खापा, ता.सावनेर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन वेलतूर** येथे महीला आरोपी हीचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन भिवापुर येथे** आरोपी क्रं १) दिगांबर मोडक मेश्राम, वय ६० वर्ष, रा. सुसुंद्री, भिवापुर, जि. नागपुर, २) सोमा भैयालाल परते, वय ४५ वर्षे, रा. कारगाव, ता भिवापुर, ३) सचिन श्रिपत लोखंडे, वय ४६ वर्ष, रा.सायगाव, ता भिवुापर, ४) भिमराव ऋषीजी गजभिय,वय ७९ वर्ष, रा.कारगाव, ता. भिवापुर यांचेवर प्रत्येकी ०१ असे ०४ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे आरोपी क्र. १) केशवराव शिवराम मरसकोल्हे,वय ६० वर्षे,रा बोथीया पालोरा, तह रामटेक,२) शिवराज वाढीवे, रा. खापा, ता. रामटेक आणि ३) महीला आरोपी यांचे वर प्रत्येकी एक गुन्हा असे ०३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे आरोपी क्र. १) कमलेश आनंदराव पराते, वय ५५ वर्ष, रा राजेंद्र प्रसाद वार्ड, रामटेक, जि. नगापुर २) महेश रमेश मजीर्वे, वय ४२ वर्ष, रा. रामाळेश्वर वार्ड, रामटेक ता. रामटेक यांचेवर प्रत्येकी एक गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** महीला आरोपी हीचे वर एक गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवणी** येथे आरोपी क्रं १) मिलन राजु काळे ,वय २७ वर्ष, रा.इटगाव ,त. पारशिवनी, आरोपी क्रं २) संजय वामन थोटे ,वय ५२ वर्ष, रा. करंभाड, त.पारशिवनी अशा आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वय २० गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) ८३ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) १०० किलो मोहाफुल सडवा ३) १५३०० मिली देशी दारू आणि ४) ६९९० मिली विदेशी दारू असा एकुण २३७००/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने